30 JAN 2022


पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दक्षिण आशिया क्षेत्रातील बहुविधतेमधील सौंदर्य जपायला हवे

## प्रा. रोमिला थापर ; शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



बहुविधतेमधील सुंदरता हे दक्षिण आशियाई क्षेत्रातील देशांचे वैशिष्ट्य ऐतिहासिक कालखंडापासून पारंपरिकरीत्या विकसित होत गेले आहे. हे सौंदर्य व सौहार्द जपण्याची जबाबदारी आधुनिक काळातील धोरणकर्त्यांनी स्वीकारायला हवी, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ प्रा. रोमिला थापर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभाग व मराठी अधिविभाग, द इंटरनॅशनल सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज, मॉस्को, रशिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय ऑनलाईन परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रा. थापर म्हणाल्या, बहुसांस्कृतिकता, बहुविधता हे दक्षिण आशियाचे वैशिष्ट्य राहिले आहे. भारताने इतिहास काळापासून नेतृत्व केले आहे. आधुनिक समकाळात सर्वांना समान संधीचे धोरण स्वीकारून सहिष्णू, अहिंसा तत्त्वांच्या अंगिकारातून येथील नागरिकत्वाच्या जाणिवा अधिक जागतिक करण्याची आवश्यकता आहे.

ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांनी बीजभाषण केले. ते म्हणाले, वसाहतवादाचा सिद्धांत व पाश्चात्त्य राजकीय विचारवंत, विश्लेषकांच्या प्रभावातून बाहेर पडून दक्षिण आशियाई विभागाचा फेरविचार करण्याची गरज आहे. जगात सात हजार भाषा आहेत, त्यातील २५ टक्के ३० वर्षांत अस्तंगत होतील. दक्षिण आशियाई देशांमधील परिस्थिती बदलण्यासाठी सर्वस्तरीय प्रयत्नांची गरज आहे.

मॉस्को येथील रशियन स्टेट युनिव्हर्सिटीच्या प्र-कुलगुरू प्रा. वेरा जबोत्किना, रशियन हाऊस इन मुंबईच्या डॉ. इलेना रेमीजवा, प्रा. अलेक्झांद्र स्तल्यारव यांनी मनोगत व्यक्त केले. विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी स्वागत केले. इंदिरा गजीयेवा यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अरुंधती पवार यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी रशियाचे भारतातील राजदूत निकोलाय कुदाशेव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद नावरे उपस्थित होते.

30 JAN 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दक्षिण आशियातील बहुविविधतेमधील सौंदर्य जपा

## शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बहुविविधतेमधील सुंदरता हे दक्षिण आशियाई क्षेत्रातील देशांचे वैशिष्ट्य. ऐतिहासिक कालखंडापासून पारंपरिकरीत्या विकसित होत गेलेले आहे. हे सौंदर्य जपण्याची जबाबदारी आधुनिक काळातील धोरणकर्त्यांनी स्वीकारायला हवी, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ प्रा. रोमिला थापर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व मराठी अधिविभाग आणि द इंटरनॅशनल सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज, मॉस्को, रशिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय बहुविद्या शाखीय ऑनलाईन परिसंवाद उद्घाटन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या.


**प्रा. रोमिला थापर**

'दक्षिण आशिया : 'अज्ञात' अवकाशांचा शोध' या शृंखलेतील 'दक्षिण आशिया : समकालीन गतिमान वास्तव : २०२२' या मध्यवर्ती विषयावर आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन परिसंवादाचे उद्घाटन शनिवारी सकाळी देश-विदेशातील मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

प्रा. थापर म्हणाल्या, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय आदानप्रदानातून येथील इतिहास, भूगोल घडला आणि आकाराला आला.

ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी म्हणाले, दक्षिण आशिया विभागात जगाच्या एकूण ८०० कोटी लोकसंख्येपैकी साधारण ११९ कोटी लोक राहतात. या लोकसंख्येचा येथील अधिवासाचा इतिहास सुमारे १२ हजार वर्षांपासूनचा आहे; मात्र अमेरिकन, पाश्चिमात्य युरोपीयन, दक्षिण आशियाई अशी त्यांची स्वतंत्र जागतिक ओळख मात्र प्रस्थापित झालेली नाही.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे रशियन विद्यापीठांशी गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ शैक्षणिक, संशोधकीय व सांस्कृतिक सौहार्दाचे संबंध आहेत. सदरचा परिसंवाद हा उभय देशांमधील हे शैक्षणिक, भाषिक तसेच सांस्कृतिक सहसंबंध अधिक दृढ व प्रगल्भ होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल.

समारंभात मॉस्को येथील रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर ह्युमॅनिटीज इंटरनॅशनल अफेअर्सच्या प्र-कुलगुरू प्रा. वेरा जबोत्किना आणि संचालक, रशियन हाऊस इन मुंबईच्या डॉ. इलेना रेमीजवा, प्रा. अलेक्झांद्र स्तल्यारव यांनी शुभेच्छा दिल्या. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी स्वागत केले. इंदिरा गजीयेवा (रशिया) यांनी प्रास्ताविक, डॉ. अरुंधती पवार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास रशियाचे भारतातील राजदूत निकोलाय कुदाशेव, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद नावरे आदी उपस्थित होते.

30 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# आशियाई देशांत सौहार्द जपणे गरजेचे

## प्रा. रोमिला थापर; शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिसंवाद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : दक्षिण आशियाई देशांचे बहुविविधतेमधील सुंदरता ऐतिहासिक कालखंडापासून विकसित होत गेले आहे. हे सौंदर्य व सौहार्द जपण्याची जबाबदारी आधुनिक काळातील धोरणकर्त्यांनी स्वीकारायला हवी, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ प्रा. रोमिला थापर यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग, मराठी अधिविभाग, द इंटरनॅशनल सेंटर फॉर साउथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज (मॉस्को,रशिया) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय ऑनलाईन परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. 'दक्षिण आशिया : 'अज्ञात' अवकाशांचा शोध' या शृंखलेतील 'दक्षिण आशिया: समकालीन गतिमान वास्तव – २०२२' हा परिसंवादाचा विषय आहे. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

प्रा. थापर म्हणाल्या, 'बहुसांस्कृतिकता, बहुविधता हे दक्षिण आशियाचे वैशिष्ट्य आहे. भारताने या क्षेत्राचे इतिहास काळापासून नेतृत्व केले आहे. इतिहासात या परिक्षेत्रात जसा संघर्ष घडला, तसाच सहअधिवासही निर्माण झाला. येथे प्रत्येक बाबतीत सहिष्णुता होती, असे नव्हते; तसेच, प्रत्येक वेळी, प्रत्येक बाबतीत हिंसेचा मार्ग अवलंबला गेला, असेही घडले नाही. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय आदान-प्रदानातून



प्रा. रोमिला थापर

येथील इतिहास, भूगोल घडला आणि आकाराला आला. अगदी हिंदू-मुस्लिमांच्या देवाण-घेवाणीतून इतिहासाला सांस्कृतिक विकासाचे आयाम प्रदान केले आहेत. एकूणच सौहार्द व साहचर्याने राहण्याचा इतिहास या विभागाला आहे.'

ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी म्हणाले, 'वसाहतवादाचा सिद्धांत, पाश्चात्य राजकीय विचारवंत व विश्लेषकांच्या प्रभावातून बाहेर पडून दक्षिण आशियाई विभागाचा फेरविचार झाला पाहिजे. दक्षिण आशिया विभागात जगाच्या एकूण ८०० कोटी लोकसंख्येपैकी साधारण ११९ कोटी लोक राहतात. याचा अर्थ जगाच्या अवघ्या साडेतीन टक्के इतक्या अल्प भूभागावर जगाची २५ टक्के लोकसंख्या राहते आहे. या लोकसंख्येचा येथील अधिवासाचा इतिहास सुमारे बारा हजार वर्षांपासूनचा आहे. मात्र, अमेरिकन, पाश्चिमात्य युरोपियनसारखी दक्षिण आशियाई अशी त्यांची स्वतंत्र जागतिक ओळख मात्र प्रस्थापित झालेली नाही. व्यामिश्र संस्कृती, व्यामिश्र भाषा आणि जातीभेद अशा वैविध्यतेने व्याप्त असलेल्या या विभागातील नागरिकांचा किमान राहणीमान दर्जा राखण्याची फार मोठी जबाबदारी धोरणकर्त्यांवर आहे.'

रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर ह्युमॅनिटीजच्या इंटरनॅशनल अफेअर्सच्या प्र-कुलगुरू प्रा. वेरा जबोत्किना व रशियन हाऊस इन मुंबईच्या संचालक डॉ. इलेना रेमीजवा, प्रा. अलेक्झांद्र स्तल्यारव यांनी शुभेच्छा दिल्या. रशियाचे भारतातील राजदूत निकोलाय कुदाशेव, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद नावरे उपस्थित होते. विदेशी भाषा विभाग प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी स्वागत केले, तरइंदिरा गजीयेवा (रशिया) यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अरुंधती पवार यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ

# विद्यापीठात लोकशाही पंधरवडा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'आजादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत २८ जानेवारी ते १० फेब्रुवारीदरम्यान लोकशाही पंधरवड्याचे आयोजन केले आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी दिली. डॉ. माने म्हणाले, की लोकशाही पंधरवडा विविध अधिविभागांच्या सहकार्याने विद्यापीठात साजरा होणार असून, अनेक स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने आयोजित केल्या आहेत. निबंध स्पर्धा (राज्यशास्त्र अधिविभाग), माईम स्पर्धा (राष्ट्रीय सेवा योजना), ३१ जानेवारी लघुपट स्पर्धा (माय कम्युनिकेशन), २ फेब्रुवारी चित्रकला (संगीत व नाट्यशास्त्र), ४ फेब्रुवारी वक्तृत्व स्पर्धा (समाजशास्त्र अधिविभाग), ७ फेब्रुवासी घोषवाक्य स्पर्धा (मराठी अधिविभाग), तर १० फेब्रुवारी, गायन (राष्ट्रीय येवा योजना) स्पर्धा होईल. स्पर्धांत सहभागी होण्यासाठी संबंधित अधिविभागांशी विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा.